<u>नियमीत दिवाणी दावा क्र.३४५/२०१८ मधील निशाणी १९ वरील आदेश</u>

(CNR No.MHOS-10000725-2018)

वादींनी प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.१ वर दुरुस्ती करण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. वादी/अर्जदारांचे असे कथन आहे की, सदर प्रकरणात नि.क्र.१ वर दावा दुरुस्त करण्याचा आदेश पारित झालेला आहे. सदर प्रकरणात मुदतीत दावा दुरुस्ती झालेली नाही. करिता दावा दुरुस्ती करण्यास झालेला विलंब माफ करुन नि.क्र.१ वर आक्षेप अर्जदार यांना प्रतिवादी क्र.२ व ३ अशी दुरुस्ती करण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

३. प्रतिवादींनी सदर अर्जाचे मागील बाजूस म्हणणे देऊन अर्ज मंजूरीस हरकत घेतली आहे. प्रतिवादींचे म्हणण्यानुसार, अर्जातील कारण सयुक्तिक नाही. वादीने यापूर्वी नि.क्र.१८ वर असाच अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज न्यायालयाने मंजूर केला होता, परंतु वादींनी दाव्यामध्ये दुरुस्ती केलेली नाही. अर्जामध्ये वादीने दुरुस्ती करण्यास विलंब झालेबाबतचे कारण नमूद केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा व जर न्यायालय अर्ज मंजूर करण्याचे निष्कर्षाप्रत आले तर वादींवर १०,०००/– रुपये खर्च ठेवण्यात यावा.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पडताळणी केली.

५. अभिलेखावरुन असे दिसून येते की, आक्षेप अर्जदार क्र.१ ते ३ यांनी त्यांना प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून समाविष्ट करणेबाबत नि.क्र.९ वर दाखल केलेला अर्ज दि.१६/०२/२०१९ रोजी मंजूर करण्यात आला व त्या अनुषंगाने वादींनी कार्यवाही करुन दाव्याची दुरुस्त प्रत दाखल करणेबाबत वादींना आदेशीत करण्यात आले होते. त्यानंतर वादींनी मुदतीत दुरुस्ती न केल्यामुळे वादींनी दुरुस्तीस झालेला विलंब माफ होऊन दुरुस्ती करणेस

परवानगी मिळणेबाबत दि.२४/०६/२०१९ रोजी नि.क्र.१८ वर अर्ज सादर केला होता. सदर अर्ज वादींवर २००/– रुपये खर्च ठेवून मंजूर करण्यात आला होता. सदर आदेशानुसार वादींनी दि.१५/०९/२०२२ रोजी खर्चाची रक्कम प्रतिवादींना दिली, परंतु दाव्यात दुरुस्ती केली नाही. त्यामुळे पुन्हा वादींनी प्रस्तुत अर्ज सादर करुन दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास झालेला विलंब माफ करुन दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे.

६. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, नि.क्र.९ वर पारित दि.१६/०२/२०१९ रोजीचे आदेशानुसार वादींनी आवश्यक कार्यवाही न केल्यामुळे प्रकरणात प्रगती होऊ शकली नाही. त्यामुळे प्रतिवादींनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. परंतु प्रस्तुत दावा हा मालकी हक्काची घोषणा व निरंतर मनाई मिळणेसाठी दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे अर्जामध्ये योग्य ती दुरुस्ती न केल्यास प्रस्तुत दावा गुणवत्तेवर चालू शकणार नाही. करिता सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. तथापि, अर्ज मंजूर करताना झालेल्या विलंबाकरिता वादींनी प्रतिवादीस खर्च रु.५००/– देणेबाबत आदेशीत करणे योग्य होईल. करिता, खालील आदेश पारित करण्यात येतो :

## आ दे श

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास झालेला विलंब प्रतिवादीस रु.५००/– खर्च देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) वादींनी आवश्यक दुरुस्ती तात्काळ करावी व दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

HANIF MOINUDDIN MOMIN
Digitally signed by HANIF MOINUDDIN MOMIN
Date: 2023.01.18 18:58:15 +0530

दिनांक : १८/०१/२०२३

**( एच.एम. मोमीन )**
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
वाशी